# सर्वोपचार रुग्णालयात औषधांसाठी झुंबड!

**अकोला :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात औषधांसाठी सोमवारी एकच झुंबड उडाली. सलग सुट्यांमुळे गर्दी वाढलेली असतानासुध्दा रुग्णालय व्यवस्थापनाकडून औषध वितरण विभागाचे गेट बंद करण्याच्या प्रकारामुळे सोमवारी दुपारी रुग्ण आणि कर्मचाऱ्यामध्ये वाद चांगलाचा विकोपाला गेला होता. मधुमेह, ब्लडप्रेशर, मनोविकार आदींसाठी औषध वितरण विभागाकडून गेल्या काही दिवसांपासून अत्यल्प औषध देण्यात येत असल्याने रुग्णांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात 'ओपीडी' केवळ सकाळच्या सत्रात सुरू असते. दुपारी १ वाजतानंतर तपासणी तर दुपारी २ वाजतानंतर औषध वितरण बंद करण्यात येते. शहरीसह ग्रामीणभागात साथीच्या आजारांनी डोकवर काढलेले आहे. उपचारासाठी रुग्ण जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात धाव घेतात. गौरी विसर्जन, गणपती विसजर्न, साप्ताहिक आदी सलग सुट्यांमध्ये सोमवार, ८ सप्टेंबर रोजीरुग्णालयात मोठी गर्दी उसळली. गर्दी पाहता, तपासणी आणि औषधी वितरणाच्या कालावधीत वेळ वाढवून देणे अपेक्षीत होते. मात्र तसे झाले नाही. याबाबत रुग्णालय व्यवस्थापनाकडे काहीच नियोजन नसते.

# अकोला जिल्ह्यातील घोंगा, कानडी लघुपाटबंधारे योजनांची दुरुस्ती होणार

## घोंगासाठी ४ कोटी ७६ लाख, तर कानडीसाठी ४ कोटी ९२ लाख रुपयांची तरतूद

**▪अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील घोंगा व कानडी लघुपाटबंधारे योजनेच्या दुरुस्तीसाठीच्या खर्चाच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

घोंगा लघुपाटबंधारे योजनेचे काम १९८६ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. तर कानडी कानडी लघुपाटबंधारे योजनेचे काम १९७७ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या पिचिंग ना-दुरुस्त झाले आहे, कालव्यामध्ये झाडेझुडपे वाढली आहेत, प्रकल्पावरील सेवारस्ता नादुरुस्त झाला आहे. त्यासाठी या दोन्ही प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी विशेष बाब म्हणून खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार घोंगा प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठीच्या ४ कोटी ७६ लाख ५५ हजार ३०० रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. या दुरुस्तीमुळे ३५ स.घ.मी. पाणीसाठा आणि ४५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. या प्रकल्पाचा मूळ पाणी साठा १५५० स.घ.मी. आणि मूळ सिंचन क्षमता ३५० हेक्टर आहे.तर कानडी प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठीच्या ४ कोटी ९२ लाख ३२ हजार ९८६ रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पाच्या दुरुस्तीमुळे ३८ स.घ.मी. पाणी साठा आणि ४६ हेक्टर सिंचन क्षमता निमर्णि होणार आहे. या प्रकल्पाचा मूळ पाणी साठा १७०० स.घ.मी. आणि मूळ सिंचन क्षमता २८६ हेक्टर आहे.

# जिल्ह्यात आरटीईच्या २३२ जागा रिक्त

**अकोला :** जिल्ह्यात आरटीई नोंदणीकृत १९९ शाळांमधील १ हजार ९९२ जागांसाठी ६ हजारांवर अर्ज प्राप्त झाले होते. त्यासाठी २ हजार ८२२ विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड झाली मात्र आतापर्यंत १ हजार ७६० विद्यार्थ्यांचेच प्रवेश झाले असून २३२ जागा रिक्त आहेत.

गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण मिळावे याकरीता महाराष्ट्र शासनाने शिक्षणाचा हक्क अर्थात आरटीई खासगी शाळांना लागू केला आहे. परंतू सदर निवड प्रक्रीया अत्यंत किचकट करून ठेवली असून एका प्रकारे विद्यार्थ्यांनाया योजनेचा लाभच मिळू नये अशी व्यवस्था शासनाकडून करून ठेवली आहे. असा प्रश्न निर्माण होते आहे.

आर टी ई अंतर्गत प्रवेशासाठी किचकट नियम असल्याने तसेच कागदपत्रांचा अभाव, जाचक अटी, भाडे करारनामा, घरांच्या जवळपास शाळा न मिळणे यासह अनेक कारणे जागा रिक्त राहण्याची असली तरी सातत्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने या जागा रिक्त राहिल्या आहेत.या रिक्त जागांवर आता प्रवेश मिळवण्याची शक्यता धूसर झाली आहे.

शिक्षण विभागाकडून रिक्त जागांवर प्रवेश घेण्यासाठी अनेकदा फेऱ्या घेण्यात आल्या.

# तेल्हारा तालुक्याला तातडीने डायलिसिस सेंटरची आवश्यकता

**▪तेल्हारा,दि ९ (प्रतिनिधी) :** तालुक्यातील मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. तालुक्यात अद्याप डायलिसिस सेंटर उपलब्ध नसल्यामुळे शेकडो रुग्णांना दर आठवड्याला ६०-७० किमी अंतरावर अकोला, अमरावती किंवा इतर शहरांकडे धाव घ्यावी लागते.

प्रवासाचा खर्च, शारीरिक थकवा आणि उपचारांचा वाढलेला खर्च यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे गंभीर संकटात सापडली आहेत.अनेक वर्षांपासून नागरिक या प्रश्नाकडे लक्ष वेधत असतानाही एकही राजकारणी याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. त्यामुळे तेल्हारा शहरातील सामाजिक कार्यकर्ते विशाल नांदोकार यांनी स्वतः पुढाकार घेत थेट मुख्यमंत्र्यांना ई-मेलद्वारे निवेदन सादर केले आहे.नांदोकार यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की :१. तेल्हारा ग्रामीण रुग्णालयात तातडीने डायलिसिस सेंटर सुरू करण्यात यावे.२. गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांना सरकारी योजनांतर्गत मोफत किंवा सवलतीच्या दरात डायलिसिस उपचार उपलब्ध करून द्यावेत.३. प्रशिक्षित डॉक्टर व तंत्रज्ञांची नेमणूक करून अत्याधुनिक उपकरणांची सुविधा द्यावी.स्थानिक आरोग्य कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की,ङ्गडायलिसिस सेंटर सुरू झाल्यास रुग्णांचा प्रवासाचा त्रास, खर्च आणि वेळ वाचेल. वेळेत उपचार मिळाल्याने अनेकांचे प्राण वाचू शकतील. तेल्हारा तालुक्यातील नागरिक, सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते या मागणीसाठी एकमुखाने उभे असून, आता तरी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### गणेश विसर्जनाच्या मिमरवणुकीत होमगार्ड जवानाला मारहाण

**▪अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :** गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत कर्तव्यावर असलेल्या गृहरक्षक दलाच्या एका जवानांना गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली असल्याची घटना समोर आली आहे बोरगाव मंजू या ठिकाणी घडलेली ही घटना होय विसर्जन बंदोबस्तासाठी लावण्यात आलेला होमगार्ड जवान दीपक सयाम हा कर्तव्यावर असताना गणेश मंडळाच्या काही कार्यकर्त्यांसोबत झालेल्या वाद विवादा नंतर कार्यकर्त्यांनी आपल्याला ओळख देऊन मारहाण केल्याचा संयम यांचा आरोप आहे. याबाबत बोरगाव मंजूर पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविण्यात आली.

# आदिवासी भागातील समस्या व उपाययोजना करीता आढावा बैठक संपन्न

## स्वयंसेवी संस्था 'खोज' चा स्तुत्य उपक्रम

**▪अडगाव बु.दि ९ (प्रतिनिधी) :** आदिवासी भागातील आदिवासींच्या विविध समस्या व त्यावरील उपाययोजना यासाठी 'खोज' या स्वयंसेवी संस्थेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेली आढावा बैठक लगतच्या धोंडाआखर येथे संपन्न झाली.

आदिवासी करीता असलेल्या विविध योजना, शैक्षणिक सुधारणा, आर्थिक उन्नती या बाबींना घेऊन ॲड बंड्या साने व ॲड दशरथ बावणकर यांचे मार्गदर्शनाखाली 'खोज' या सामाजिक संस्थेने धोंडाआखर येथे आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

आदिवासी विकास निरीक्षक संकल्प खरात यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत गट शिक्षणाधिकारी श्रीमती सुनीता बकाल, केंद्र प्रमुख शिवाजीराव तायडे, मुख्याध्यापक किशोर कोल्हे, रामदास भीलावेकर, अनिल मावशे व जयकिसन दरसिमबे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी आदिवासी करिता आदिवासी विभागामधून असलेल्या सर्व योजनांची माहिती परिसरातील धोंडाआखर, चीपी,भिली,करी रुपागड येथील बहुसंख्येने उपस्थित आदिवासींना देऊन असलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आदिवासी बांधवांनी स्वतःहून पुढाकार घेतला पाहिजे.

असे आवाहन आदिवासी विकास निरीक्षक संकल्प खरात यांनी केले. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारणे तसेच विद्यार्थी पटसंख्या वाढी करीता शिक्षक,पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी विशेष लक्ष द्यावे ही बाब गटशिक्षणाधिकारी बकाल यांनी मांडली यावेळी आदिवासी भागात बरेच ठिकाणी शाळा खोल्यांची अवस्था चांगली नसल्याची तक्रार बहुसंख्य पालकांनी केली.

# पातूर येथे अखेर गजराज चालला – अतिक्रमण मोहिमेला जोरदार प्रारंभ

## शिरला ग्रामपंचायत क्षेत्रात अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू

**▪पातूर,दि ९ (प्रतिनिधी) :** पातूर शहर व शिरला ग्रामपंचायत हद्दीत वाढत चाललेल्या अतिक्रमणांवर अखेर प्रशासनाने गजराज चालवत कठोर कारवाई सुरू केली आहे. शासनाच्या आदेशानुसार दिनांक ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत अतिक्रमण धारकांना स्वतःहून अतिक्रमण हटविण्याच्या सूचना ग्रामपंचायत सरपंच व सचिवांनी दिल्या होत्या. या मुदतीनंतर ज्यांनी स्वयंपूर्णतेने अतिक्रमण काढले नाही, त्यांच्यावर आज गजराजाच्या साहाय्याने कारवाई करण्यात आली.ही अतिक्रमण मोहीम तहसील कार्यालय, पातूर येथून सुरू झाली. त्यानंतर जुना वाचनांगण परिसर, बालापूर रोड मार्गे संभाजी महाराज चौक येथे कारवाई झाली. दिवसभर ही मोहीम सातत्याने राबविण्यात आली असून आज अनेक अतिक्रमण हटविण्यात आले आहेत. प्रशासनाच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार आज अपूर्ण राहिलेले





अतिक्रमण हटविण्याचे काम उद्या (१० सप्टेंबर) पूर्ण करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतीकडून दिलेल्या सूचनेनुसार अनेक अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून प्रशासनाला सहकार्य केले. तथापि, ज्या अतिक्रमणधारकांनी निर्देशांचे पालन केले नाही, त्यांच्यावर थेट गजराज चालविण्यात आला. त्यामुळे परिसरातील मुख्य मार्ग व चौक मोकळे झाले असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.या मोहिमेबाबत पातूर तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांनी सांगितले की -'शासनाच्या आदेशानुसार ही अतिक्रमण मोहीम राबविण्यात येत आहे. अनेकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून सहकार्य केले आहे. परंतु ज्यांनी नाही, त्यांच्यावर गजराज चालविण्यात आला आहे. ही मोहीम सातत्याने सुरू राहील. त्यामुळे कुणीही पुन्हा अतिक्रमण करू नये, अन्यथा कठोर कारवाई होईल.'पातूर व शिरला ग्रामपंचायत क्षेत्रात सुरू झालेल्या या अतिक्रमण विरोधी मोहिमे मुळे नागरिकांमध्ये शिस्त निर्माण होईल.

# तेल्हारा नगरपरिषदेला आली जाग

## संत तुकाराम महाराज चौकात साफसफाईला सुरुवात



**▪तेल्हारा,दि ९ (प्रतिनिधी) :** संत तुकाराम महाराज चौक परिसरात गेल्या काही दिवसांपासून कचऱ्याचा मोठा ढीग साचला होता. या कचऱ्यामुळे नागरिकांना दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याचा धोका निर्माण झाला होता.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते विशाल नांदोकार यांनी नगरपरिषदेला लेखी निवेदन दिले होते. याआधी सिटी न्यूज सुपरफास्ट या वृत्तपत्राने संबंधित प्रकारावर प्रकाश टाकत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर नागरिकांची तक्रार व नांदोकार यांचे निवेदन या दोन्हींचा परिणाम म्हणून अखेर नगरपरिषद प्रशासनाने चौक परिसरात साफसफाई मोहिम हाती घेतली आहे.आज सकाळपासूनच सफाई कामगारांनी मोठ्या प्रमाणातील कचरा हटवून परिसर स्वच्छ करण्याचे काम सुरू केले. विशाल नांदोकार म्हणाले, ङ्गनागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर वेळेवर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

संत तुकाराम महाराज चौक हा नागरिकांच्या दैनंदिन वावराचा भाग असल्याने येथे स्वच्छता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून अशा प्रकारची नियमित स्वच्छता मोहिम राबवावी अशी मागणी केली आहे.

# हिवरखेडच्या दोन दिवस चालनारे गणपतीचे शांततेत विसर्जण

**▪हिवरखेड,द ९ (प्रतिनिधी) :** शहर येथे सालाबाद प्रमाने दोन दिवसीय गणेश ऊत्सव रविवारला दुपारी चार पासून प्रारंभ संत तुकाराम महाराज चौका पासून सर्व गणेश मंडळे मिरवनुकीत सामील गावातील गजानन महाराज सस्थान कीसनगिर मळी मानाचा गणपती हा पहील्या क्रमाकांवर असतो तर यावर्षी सर्व मंडळाना नंबर दिले असून सर्व चौदा मंडळ मिरवनुकीत आजच्या दोन दिवसिय मिरवनूकीत खालील प्रमाने नवयूवक मंडळ चडिंका चौक जय संभाजी गणेश मंडळ ऊगले प्लाट, जय भोले गणेश मंडळ मोठे बारगण,सिद्धिविनायक गणेश मंडळ बारगणपुरा मोठा महादेव सस्थान,



जय भवानी गणेश मंडळ विजय नगर,शकर सस्थान गणेश ऊत्सव मंडळ, जय बजरग गणेश मंडळ ईदीरानगर, फत्तेपुरी सस्थांन गणेश मंडळ छत्रपती शिवराय गणेश मंडळ गोर्धावेस मळी, स्वस्तीक गणेश मंडळ कॉलनी, दाईबुवा गणेश मडंळ खारोणपुरा, जय शिवाजी गणेश मडंळ मराठा नगर ,असे चौदा मंडळानी दोन दिवसिय मिरवनुकीत भाग घेतला मिरवनूकीत सगळ्यात जास्त शिस्तता बद्द असे सिद्दीविनायक गणेश ऊत्सव मंडळ बारगण पुरा यांचे समोर असलेले वानखेडचे माऊली भक्त सत्तर वारकरी भजन मंडळाचे पाऊली देशभक्तीपर भजनानी आनली मनाचा गणपती जवळ वीठ्ठल मंदीर वारकरी भजनाने मिरवनुकीत गणेशभक्तीचा भजनाने भक्तीमय वातावरण निर्मान केले ईतर मंडळाकडे डिजेकम बॅड पथकाने तरुणाईने नाचत गाजत रंगत आनली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अर्चीत चांडक याचे मार्गदर्शनात ऊपविभागीय पोलीस अधिकारी नितीन पाटील हिवरखेड पोलीस स्टेशन ठानेदार गजानन राठोड व दुय्यम दोन्ही ठानेदार गोपाल गिलबिले, श्रिराम जाधव बिट अमलदार गणेश सोळंके पकंज मडावी, आकाश गजभार प्रफुल पवार,योगेश ईगळे साबळे अमोल बुंदे, कमांडो फोर्स , पोलिस कुमक सह गृहरक्षक दलाचे गोपाल परनाटे सतोंष शर्मा भराटे सजंय खिरोडकर राजू खॉन तसेच, महिला पोलीस अमलदार व गृहरक्षक शांतता समीतीचे प्रकाश पाटील गावंडे शेवट पर्यत सर्व सामील होते

# पोलिस कर्मचाऱ्याला तीन महिन्याचा कारावास

**अकोला :** शिस्त आणि परंपरेचा आदर्श ठरलेल्या शिवापूर येथील जय भवानी व्यायामशाळेने यंदाही आपल्या सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत नेत्रदीपक प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांना थक्क केले. ३५ वर्षांची अखंड परंपरा जपणाऱ्या या व्यायाम शाळेच्या शिस्तबद्ध पथकाने सादर केलेल्या विस्मयकारक प्रदर्शनाने नागरिकांचे डोळे दिपले. उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत या विलक्षण सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली. या भव्य सोहळ्याचे उद्घाटन करण्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. महानगरपालिका आयुक्त सुनील लहाने, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, आयपीएस अधिकारी चंद्रकांत रेड्डी, आर आर सी नेटवर्कचे कार्यकारी संचालक प्रदीप उर्फ बडूभाई देशमुख, डॉ. आरती लता ठाकरे, आणि महाबीजचे प्रफुल्ल लहाने यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

व्यायामशाळेचे अध्यक्ष केशव पातोंड यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली या मिरवणुकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सोहळ्यासाठी संचालक मंडळातील निळोबा ढोरे, प्रल्हाद ढोरे, डॉ. गजानन डोईफोडे, गजानन ढोरे, संजय गडेकर, विलास ढोरे, आणि समाधान ढोरे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व युवकांनी मोलाची भूमिका बजावली.

## थोडक्यात

### पीओपी मूर्ती व निर्माल्याचे संकलन करुन नदी स्वच्छतेचा घेतला वसा



**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्क, खडकी-अकोला यांच्या वतीने ६ सप्टेंबर रोजी श्री गणेश विसर्जनाच्या दिवशी एक अनुकरणीय आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. अकोला शहरातील हिंगणा फाटा आणि चांदुर येथील श्री गणेश घाटांवर पीओपीच्या मूर्ती आणि निर्माल्याचे संकलन करून नदी पात्र स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणावर प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्तींचे विसर्जन नदीत केले जाते, जे पर्यावरणासाठी अत्यंत घातक ठरते. या पार्श्वभूमिवर विद्यार्थ्यांनी स्वखुशीतून पुढाकार घेत नदीतून पीओपी मूर्ती काळजीपूर्वक बाहेर काढल्या आणि त्या मनपाकडे सुपूर्द केल्या. यावेळी नदी पात्र स्वच्छ करून परिसरात स्वच्छतेचा संदेश दिला गेला. या उपक्रमात प्रमुख विद्यार्थी सहभागी म्हणून प्रसाद गावंडे, तुषार खंडेराव, सुमित शेकू, सुमित वानखडे, आदित्य अरबट आणि सुमेधवानखडे यांनी विशेष योगदान दिले. त्यांच्या कार्याची प्रशंसा स्थानिक नागरिक आणि मनपा अधिकाऱ्यांनी केली. 'पर्यावरण वाचवा, भविष्य उज्वल करा' असा संदेश विदयार्थ्यांनी देत समाजाला पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा दिली.

# आगीखेड फाटा ते पार्डी रस्त्याची स्वच्छता मोहीम यशस्वी

## शेतकरी पुत्र आशिष पाटील व सामाजिक कार्यकर्ते उज्ज्वल सिरसाट यांच्या पुढाकाराला यश

**▪पातुर,दि ९ (प्रतिनिधी) :** आगीखेड फाटा ते पार्डी गावापर्यंतच्या रस्त्याची गेल्या काही महिन्यांपासून अतिशय दुरवस्था झाली होती. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले होते, रस्ता पूर्णपणे उखडलेला असल्याने नागरिकांना प्रवास करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. तसेच रस्त्यावर झाडे व झुडपे वाढल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. या रस्त्याने लहान मुले शाळेत ये-जा करत असल्यामुळे त्यांना मोठा धोका होता. शिवाय पार्डी परिसरात रात्रीच्या वेळी जंगली जनावरांचा वावर असल्याने गावकऱ्यांना भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.या गंभीर परिस्थितीची दखल घेत शेतकरी पुत्र आशिष पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते उज्ज्वल सिरसाट यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.



त्यानंतर मा. तहसीलदार साहेबांच्या आदेशानुसार गट ग्रामपंचायत आगीखेड-पार्डीचे सरपंच गजानन टप्पे यांच्या सहकार्याने रस्त्याची स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. गउइ च्या साहाय्याने रस्त्यावरील झाडे-झुडपे हटविण्यात आली व रस्त्याची साफसफाई करण्यात आली.या उपक्रमात पार्डी गावातील अनेक ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यामध्ये -मा. उज्ज्वल सिरसाट, सहदेव अत्तरकार, सचिन हिवराळे, गोपाल बहाकर, सुधीर अत्तरकार, अमर हिवराळे, नितीन हिवराळे, हर्षल सिरसाट, विशाल बहाकर, अनिल अत्तरकार, रवी बहाकर, अमोल बहाकर, ऋतिक खुळे, विकास सिरसाट, रामु शिंदे, संजय बहाकर, अरुण बहाकर, रमेश अवचार, आशिष हिवराळे, विनोद बंड, गजानन हिवराळे, संदीप खुळे, सुनील अवचार, संजय शेळके, बबलू हिवराळे, कुंदन इंगळे, स्वप्नील हिवराळे, आचल निखाडे, अनु बावस्कार, शुद्धोधन हिवराळे, पप्पू हिवराळे, सौरव चोंडकर, नितीन सोनोने आदींचा विशेष सहकार्य होता.या उपक्रमामुळे रस्ता स्वच्छ व सुकर झाल्याने गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुलांना शाळेत ये-जा करताना सुरक्षितता मिळणार असून वाहतुकीसही सुलभता निर्माण झाली आहे. तसेच रात्रीच्या वेळी जंगली प्राण्यांच्या धोक्यापासूनही काही प्रमाणात संरक्षण मिळणार आहे.या कार्यवाहीमुळे गावकऱ्यांनी तहसील प्रशासन, ग्रामपंचायत तसेच पुढाकार घेणारे शेतकरी पुत्र आशिष पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते उज्ज्वल सिरसाट यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.

### खड्डे बुजविण्यासाठी मातीमिश्रित मुरुम

**▪अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :** शहरातील काही ठिकाणी खड्डे बुजविण्याचे काम सुरू असून, यासाठी मातीमिश्रीत लाल मुरुमाचा वापर केल्या जातअसल्याने त्याचा चिखल होऊन रस्ते घरसगुंड्या होत आहेत. तसेच मुसळधार पाऊस झाल्यास खड्यातील मुरुम वाहून जात आहे.

त्यामुळे रस्ते पुन्हा जैसे थे होत आहेत. शहरातील सर्वच प्रमुख मार्गावर खड्ड्यांचे जाळे विणले. आहे. त्यामुळे वाहनधारकांना खस्ता खात वाहने चालवावी लागत आहेत. त्यामुळे हाताची मनगट दुखत असून, मानेचे व कमरेचेआजार उदभवत आहेत.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्री**कृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

